शिक्षक प्रशिक्षणातील आंतरवासितेचा शाळा व्यवस्थापनावर होणारा परिणाम - एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाच्या अंतरविद्याशाखा अंतर्गत शिक्षणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीच्या अंशतः पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

सिंधीकुमठे विश्वनाथ प्रभाकर

मार्गदर्शक

डॉ. मुगळे दिलीप मनोहर

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

जूलै २०१९

अ. क्र.	विवरण	पृष्ठ क्रमांक
	मुख्यपृष्ठ	१
	अनुक्रमणिका	२
१	प्रस्तावना	३-४
२	संशोधन विषयाची गरज	४-५
३	संशोधन विषयाचे महत्त्व	५-६
४	संशोधन विषयाची शीर्षक	६
५	कार्यात्मक शब्दांच्या व्याख्या	६-७
६	संशोधनाची उद्‌दिष्टे	७
७	संशोधनाचे गृहितके	७
८	संशोधनाची व्याप्ती	७-८
९	संशोधनाची मर्यादा	८
१०	संशोधन पद्‌धती	८
११	जनसंख्या व नमुना निवड	८-९
१२	माहिती संकलनाची साधने	९
१३	संख्याशास्त्रीय परिमाणे	९
१४	संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही	१०
१५	संशोधनाचे वेळापत्रक	११
१६	संशोधनाचे अंदाजपत्रक	११
१७	संदर्भ ग्रंथ सूची	१२

१. प्रस्तावना :

शिक्षकी पेशा हा केवळ व्यवसाय नसून ती एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे यासाठी कौशल्य विकास स्वभाव व सामर्थ्याने कार्य करणारा तसेच विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जोपासना करणे व मूल्य संवर्धन करण्यास सक्षम असा शिक्षक होणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक शिक्षक कौशल्यपूर्ण संपूर्ण कौशल्य आत्मसात करणारा व हाडामासाचा असेलच असे नाही यासाठीच शिक्षक प्रशिक्षणाचा समावेश शिक्षण प्रक्रियेत करण्यात आलेला आहे. प्राचीन काळापासून ते आजतागायत शिक्षण प्रशिक्षणाचे स्वरुप बदलत आलेले आहे पूर्वी प्राचीन काळात गुरुकुल पद्धती होती त्यात गुरूच्या आश्रमात प्रशिक्षणार्थ्यांची सोय होती ती आता महाविद्यालयात व शाळांनी जागा घेतली आहे.

गुरुकुल पद्धती नंतर भारतात इंग्रज आले आणि शिक्षण प्रक्रियेची फार मोठा बदल घडून आणला. त्यात शिक्षण पद्धतीचे निरीक्षण व अवलोकन शास्त्रशुद्ध व पद्धतशीर रीतीने शिक्षण प्रशिक्षण सुरू केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण क्षेत्रात भारतामध्ये वेगवेगळ्या आयोगाची स्थापना झाली त्यांनी शिक्षण प्रशिक्षणाची पद्धती बदलण्यास सांगितल्या त्या नुसारच शिक्षण प्रशिक्षणात बदल झाला. उदाहरणार्थ राधाकृष्ण आयोग, मुदलीयारआयोग, कोठारी आयोग तसेच राममूर्ती आयोग व त्याच बरोबर १९८६ चा राष्ट्रीय धोरण इत्यादी. शिक्षक प्रशिक्षण म्हणजे नुसते अध्यापन नसून त्यांच्या प्रशिक्षणातून पूर्ण कौशल्य प्राप्त करणे व त्यातून योग्य असा व उत्तम शिक्षक घडविण्याचे कार्य पूर्ण होते यामध्ये महत्त्वाचा भाग म्हणजे आंतरवासिता आहे. हा भाग बी. एड साठी कोठारी आयोगाने लागू केला आहे व्यवसायिक शिक्षण जसे वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या शिक्षणानंतर आंतरवासितेचा सामावेश होतो पण सद्यस्थितीत अध्यापक विद्यालय व महाविद्यालय यांचा अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे त्याच बरोबर आंतरवासिता राबविण्यासाठी अध्यापक विद्यालय व महाविद्यालय यांनी काही शाळेची निवड करून अंतरवासितेचे नियोजन करून प्रशिक्षणार्थ्यांना आंतरवासिता हा भाग पूर्ण करून घेतात. यांचा उद्देश म्हणजे प्रशिक्षणार्थी शिक्षक म्हणून काम करण्यापूर्वी शाळेचे कामकाज, नियोजन, अध्ययन-अध्यापन पद्धती त्याप्रमाणे शालेय उपक्रम कोणते याची माहिती मिळते व ते उत्तम रित्या हे कार्य पूर्ण करावा या हेतूनेच.

आंतरवासिता कार्यक्रमाचा महत्त्वाचा टप्पा १९०९ मध्ये ब्राऊन विद्यापीठात सुरुवात झाली. त्यानंतर बंगाल प्रांतात श्रीरामपूर येथे विल्यम केरी यांनी प्रशिक्षण विद्यालय सुरुवात केली. पुढे हा डी. एड. व बी. एड. अभ्यासक्रमात आठ ते दहा दिवसांची घेण्यात येत होती परंतु २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून बी. एडच्या अभ्यासक्रम बदलला आहे. पूर्वीच्या आठ ते दहा दिवसा ऐवजी प्रथम वर्षी चार आठवडे व द्वितीय वर्षात १६ आठवडे याप्रमाणे १९ ते २०

आठवड्यांच्या आंतरवासितेचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे ज्या शाळेत आंतरवासिता राबविण्यात येत असते अशा शाळांच्या नियोजनावर अतिरिक्त भर पडली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या अध्यापक महाविद्यालयात संशोधक गेल्या तीन वर्षापासून अध्यापन कार्ये करत असताना असे जाणवले की आंतरवासिता राबवित असताना शाळा व्यवस्थापनावर फार बदल होत चालला आहे. त्यामुळे शाळेतील व्यवस्थापनात अतिरिक्त भार पडत आहे. त्याच बरोबर नियमीत शिक्षक व प्रशिक्षणार्थीत एक वाक्यता नसल्या कारणामुळे कधीकधी शाळा व्यवस्थापनाबरोबर शाळेतील गुणवत्तेवर परिणाम पडत आहे. या सर्वांचा अभ्यास केल्यानंतर असे जाणवले की काही प्रशिक्षणार्थी फक्त प्रात्यक्षिकाचा भाग म्हणून आंतरवासिता कडे वेगळया नजरे पाहत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्यापन-अध्यापनकार्यात बदल होत असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे. यावरून असे ठरवण्यात येते की आंतरवासिता भाग जर पूर्ण रित्या व शाळेत व्यवस्थापनात येणाऱ्या अडचणी चा शोध घेणे व त्यावर उपाय योजना करणे तसेच नियमित शिक्षक व मुख्याध्यापक प्रशिक्षणार्थी यांच्यातील संबंधाचा अभ्यास करून उपाययोजना करण्यासाठी तसेच संशोधकांनी आंतरवासिता राबवण्यात येणाऱ्या शाळा व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन कार्य करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

२. संशोधनाची गरज :

सन २०१५-१६ पासून बी. एडच्या अभ्यासक्रमात अमुलाग्र बदल करण्यात आलेला आहे व बी. एड अभ्यासक्रमात आता दोन वर्षाचा करण्यात आला आहे. ह्या बी. एड अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक कार्य म्हणून हा घटक दोन्ही वर्षात अंतर्भूत करण्यात आला आहे. प्रथम वर्षात आंतरवासिता भाग चार आठवड्यांसाठी व ७५ गुणासाठी व द्वितीय वर्षात १६ आठवडे व   २०० गुणांसाठी अंतर्भूत करण्यात आलेली आहे त्यामुळे बी. एड प्रशिक्षणार्थ्यांना प्रात्यक्षिक कार्य म्हणून व पुढील आयुष्यात शिक्षकी पेशात उतरल्यानंतर शाळेतील व्यवस्थापन व अध्ययन-अध्यापन पध्दती इत्यादी गोष्टी शिकण्यासाठी म्हणून आंतरवासिता घटक पूर्ण करणे गरजेचे आहे.

या आंतरवासितेच्या कालावधीत बी. एड प्रशिक्षणार्थी हा नियमित शिक्षकांचे काम करतो व नियमित शिक्षकांच्या देखरेखीखाली किंवा मार्गदर्शनाखाली संपूर्ण शाळेचे व्यवस्थापन, दैनिक परिपाठ, हाजेरी, पाठ टाचण, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया तसेच शाळेच्या वेळापत्रकानुसार संस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, जयंत्या, पुण्यतिथी व राष्ट्रीय सण इत्यादी कार्यक्रम पूर्ण करतो. पण जेव्हा आंतरवासिता एखाद्या शाळेवर म्हटली की त्या शाळेच्या वार्षिक नियोजनावर

अतिरिक्त भार पडतो. यामध्ये नियमित शिक्षक, शाळेचे दैनंदिन कामकाज, विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन कार्य तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर व इतर शाळेचे व्यवस्थापनावर चांगला किंवा वाईट परिणाम करू शकतो. याचे कारण असे की आंतरवासिता कालावधीत शाळेचे व्यवस्थापन हे बी. एड. प्रशिक्षणार्थ्याकडे असतो व त्यांना शाळेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व शिक्षकाकडून मार्गदर्शन घ्यावयाचे असते. बी. एड. प्रशिक्षणार्थी अप्रशिक्षित असल्यामुळे शाळा व्यवस्थापन सांभाळणे थोडीशी कठीण जाते. त्यामुळे शाळेचे दैनिक नियोजन, अभ्यासक्रम, दैनंदिन नियोजन, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ही नियमीत शिक्षकासारखे असेलच किंवा जमेल असे नाही. त्यामुळे शाळेचे व्यवस्थापन अतिरिक्त भार पडतो. आंतरवासितेमुळे शाळेच्या व्यवस्थापनात वेगळ्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे शाळेची गुणवत्ता व विद्यार्थ्यांची गुणवत्तेवर परिणाम पडतो.

आंतरवासितेमुळे नियमित शिक्षक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व प्रशिक्षणार्थी यांच्यात जर सामंजस्य असेल तर शाळेचे व्यवस्थापनावर चांगले परिणाम घडू शकतो पण यांच्यात जर सामंजस्य झाले नाही तर शाळेचे व्यवस्थापनावर विपरीत परिणाम घडतो. त्यामुळेच व्यवस्थापनात नव्या समस्या निर्माण होतात. आणि त्याचा परिणाम शाळेच्या गुणवत्तेवर होतो.

त्याच बरोबर कोणकोणत्या समस्या निर्माण होतात त्यावर कोणकोणत्या उपाययोजना करता येतील. त्यामुळे प्रशिक्षणार्थी आपल्या आंतरवासिता प्रात्यक्षिक भाग पूर्णपणे यशस्वीरित्या पूर्ण करतील व शाळेच्या व्यवस्थापन विपरीत परिणाम पडणार नाही. यासाठी संशोधनाची गरज वाटते त्यामुळे या विषयावरसंशोधन करणे काळाची गरज आहे.

३.संशोधनाचे महत्त्व :

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व खालील प्रमाणे:

१) शाळेतील व्यवस्थापन हे प्रशिक्षणार्थ्याच्या हाती दिल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यास संधी मिळते.
२) शाळेची दैनंदिन कामकाज हे नियमित शिक्षक मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व प्रशिक्षणार्थी यांच्यात सामंजस्य निर्माण झाल्यास शाळेचे व्यवस्थापनावर ताण पडणार नाही.
३) आंतरवासिता कालावधीत जास्त दिवसाचा असल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना सहशालेय उपक्रम, क्रीडास्पर्धा, जयंती-पुण्यतिथी व दिनविशेष इत्यादी कामेही शाळेच्या वेळापत्रकाप्रमाणे केल्यास शाळेच्या व्यवस्थापनावर अतिरिक्त भार पडणार नाही.
४) आंतरवासितेमुळे शाळेच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम झाला तर त्याच प्रमाणे शाळेचे व्यवस्थापनात अंमलबजावणी करता येते व विपरीत परिणाम झाला तर सुधारणा करण्यात येतात

५) बी. एड. प्रशिक्षणार्थी हे शाळेतील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व नियमित शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली जर आंतरवासितेतील दैनंदिन कामकाज, अध्ययन-अध्यापन व इतर कार्यक्रम वेळापत्रकानुसार योग्यरित्या केले तर शाळेच्या गुणवत्तेवर व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम घडून येऊ शकतो.

४. संशोधनाचे शीर्षक :

शिक्षक प्रशिक्षणातील आंतरवासितेचा शाळा व्यवस्थापनावर होणारा परिणाम - एक अभ्यास

५. कार्यात्मक शब्दांच्या व्याख्या :

१) शिक्षक प्रशिक्षण : शिकाऊ उमेदवाराला शिक्षक होण्यासाठी औपचारिक पद्धतीने दिले जाणारे प्रशिक्षण म्हणजे शिक्षक प्रशिक्षण होय.

२) आंतरवासिता :- सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रत्यक्ष जाऊन करावयाच्या कार्याचा पूर्वानुभव मिळवण्याच्या दृष्टीने पूर्ण शाळेत उपस्थित राहून प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूती देण्यासाठी आयोजित केलेल्या शिक्षक प्रशिक्षणातील एक उपक्रम.

३) शाळा व्यवस्थापन :- शैक्षणिक संस्थेने स्वतःच्या गरजा व आवशकता लक्षात घेऊन उपलब्धसाधन समाग्रीचा विचार करून स्थानिक पातळीवरनियोजन करणे गरजेचे आहे. म्हणजेच एखाद्या संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, संस्थेतील कुशल मनुष्यबळ आणि त्याचा परिणामकारक उपयोग करून घेण्यासाठी आखलेल्या विविध उपक्रमाचा संच म्हणचेच शाळा व्यस्थापन.

६. संशोधनाची उद्दिष्टे :

१) शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राबविण्यातयेणाऱ्या अंतरवासिता कालावधीततील शाळेचे व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

२) आंतरवासिता कालावधीत शाळेच्या व्यवस्थापनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

३) आंतरवासितेच्या कालावधीत ज्या ज्या शालेय व्यवस्थापनीय घटकांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

४) आंतरवासितेमुळे शाळेचे व्यवस्थापन, शाळेची गुणवत्ता व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

५) आंतरवासितेच्या कालावधीत शाळेच्या व्यवस्थापनात येणारे समस्यावर उपाय योजना करणे.

७. संशोधनाची गृहितके :

१) आंतरवासितेमुळे शाळा व्यवस्थापनावर अतिरिक्त भार पडतो.
२) आंतरवासितेमुळे शालेय व्यवस्थापन व विद्यार्थ्यांची गुणवत्ता यावर होणारा परिणामाकडे शालेय व्यवस्थापन समिती गांभीर्याने पाहत नाही.
३) आंतरवासिता राबवित असताना शाळेच्या व्यवस्थापनावर विपरीत परिणाम दिसून येतो.
४) आंतरवासिता राबवित असताना शाळा व्यवस्थापनात अनेक समस्या येतात त्यामुळे शालेय व्यवस्थापन समितीची उद्दिष्टे साध्य होत नाही.
५) आंतरवासिता कालावधीत नियमित शिक्षक व प्रशिक्षणार्थी शिक्षक यांच्यातील समन्वयावर विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता अवलंबून असते.
६) आंतरवासितेमुळे शाळेचे निकालावर परिणाम दिसून येतो.
७) आंतरवासितेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिस्तीत बदल दिसून येतो.
८) आंतरवासितेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम दिसून येतो.
९) आंतरवासिताबाबत बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांची उदासीनता असल्यामुळे त्यांच्या अध्यापन कार्य निरुत्साह दिसून येतो.
१०) आंतरवासिता ही फक्त प्रत्यक्षिकाचा भाग आहे हे समजून बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन कार्यात उपजत गुणांना वाव देता नाही. त्यामुळे त्यांचा परिणाम विद्यार्थ्यावर दिसून येतो.

८. संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील नांदेड, लातूर, परभणी, व हिंगोली या चार जिल्ह्या इतकी व्याप्ती आहे. अध्यापक महाविद्यालयातील प्राचार्य, अधिव्याख्याता, प्रशिक्षणार्थी तसेच आंतरवासिता राबविण्यात येणाऱ्या शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व पर्यवेक्षक पुरते व्याप्त. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार आंतरवासिता व आंतरवासिता राबविण्यात येणाऱ्या शाळा एवढ्यापुरते व्याप्त आहे.

सदर संशोधन कालावधी ही २०१९ ते २०२२ इतकी आहे.

९. संशोधनाची मर्यादा :

प्रस्तुत संशोधन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या चार जिल्हयापुरते मर्यादित आहे. अध्यापक महाविद्यालयातील प्राचार्य, अधिव्याख्याता, प्रशिक्षणार्थी तसेच आंतरवासिता राबविण्यात आलेल्या शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व पर्यवेक्षिका पुरते मर्यादित आहे. स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार आंतरवासिता व आंतरवासिता राबविण्यात आलेल्या शाळा एवढ्यापुरते मर्यादित आहे.

सदरील संशोधनाचा कालावधी २०१९ ते एक २०२२ इतका आहे.

१०. संशोधन पद्धती :

संशोधन समस्येची उकल करण्यासाठी योग्य संशोधन पद्धती निवडणे आवश्यक असते. संशोधन पद्धतीची निवड संशोधन समस्येचे स्वरूप, उद्दिष्टे, माहिती स्वरूप इत्यादी गोष्टीवर आधारित असते.

संशोधनामध्ये आपण आपली समस्या निवडली की नंतर ती समस्या सोडवण्यासाठी कार्यवाहीचा आराखडा तयार करून ती समस्या सोडवण्यासाठी आपल्या योग्य पद्धतीची निवड करणे आवश्यक असते.

१) ऐतिहासिक संशोधन पद्धती :- भूतकाळाशी संबंधित असणाऱ्या समस्येचे संशोधन.

२) वर्णनात्मक संशोधन पद्धती :- वर्तमान काळाशी संबंधित असणाऱ्या समस्येचे संशोधन.

३) प्रायोगिक संशोधन पद्धती :- भविष्यकाळाची संबंधित असणाऱ्या समस्येचे संशोधन.

संशोधकांनी निवडलेल्या संशोधन समस्या ही सध्या अस्तित्वात असणाऱ्या परिस्थितीची किंबहुना वर्तमान परिस्थिती संबंधित आहे म्हणून संशोधकाने सर्वेक्षण ही संशोधन पद्धतीची निवड करण्यात येणार आहे.

११. जनसंख्या व नमुना निवड (न्यादर्श) :

जनसंख्या संशोधन विषयाशी संबंधित घटकांच्या समूहाला जनसंख्या असे म्हणतात. जनसंख्येत समस्येशी संबंधित सर्व घटकांचा समावेश होत असतो.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत येणाऱ्या चार जिल्हयातील शिक्षणशास्त्र महाविद्यालये व त्यांना सलग्नित येणाऱ्या संबंधित शाळा.

न्यादर्श प्रस्तुत संशोधनासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत येणाऱ्या चार जिल्हयातील शिक्षणशास्त्र महाविद्यालये व संबंधित शाळा पैकी ५० टक्के महाविद्यालये व संबंधित शाळा यादृच्छिक नामुना निवडीतील लॉटरी पद्धतीचा वापर करून निवडण्यात येतील.

१२. माहिती संकलनाची साधने :

संशोधकाने संशोधनासाठी जो विषय निवडला आहे त्या संबंधात विविध प्रकारची माहिती गोळा करावी लागते, जमा करावी लागते किंवा संकलित करावी लागते. या अनेक साधनांमधून संशोधकाने योग्य त्या साधनांची निवड करणे आवश्यक असते. ही निवड योग्य होण्यासाठी संशोधकाला त्या साधनाच्या गुणदोषांची जाणीव असणे आवश्यक आहे. साधनाच्या विविध प्रकारांतून एक अथवा अनेकसाधनांचा वापर संशोधक करू शकतो ही माहिती संख्यात्मक गुणात्मक स्वरूपाची असू शकते.

स्वनिर्मित प्रश्नावली - पर्यवेक्षक, शिक्षक, प्रशिक्षणार्थी, प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक

मुलाखत - मुख्याध्यापक

स्वनिर्मित प्रश्नावली व मुलाखतीचे प्रश्न तज्ज्ञाकडून तपासून घेऊन त्यातील सूचनांचे पालन करून अंतिम प्रश्नावल्या तयार केल्या जातील व मुलाखतीचे प्रश्न योग्य ते घेतले जातील.

१३. संख्याशास्त्रीय परिमाणे :

प्रस्तुत संशोधनासाठी सांख्यिकी परिमाणात केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे, शेकडेवारी व आलेख यांचा वापर करण्यात येणार आहे.

१४. संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही :

प्रस्तुत संशोधनाची प्रत्यक्ष कार्यपद्धती

⇩

संशोधन समस्या निश्चिती

⇩

आराखडा निर्मिती

⇩

आराखडा सादरीकरण

⇩

आराखडा अंतिम मंजुरी

⇩

संबंधित व पूर्व संशोधनाचा आढावा

⇩

जनसंख्या व न्याय दर्श निवड

⇩

साधन निश्चिती व निर्मिती

⇩

पथदर्शक अभ्यास

⇩

माहिती संकलन

⇩

माहिती विश्लेषण व अर्थनिर्वचन

⇩

निष्कर्ष आणि शिफारशी

⇩

अहवाल लेखन

⇩

या प्रकारे प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यात येईल.

१५. संशोधनाचे वेळापत्रक :

अ. क्र.	तपशिल	कालावधी
१	आराखडा निर्मिती	दोन आठवडे
२	आराखडा मंजुरी	दोन महिने
३	पथदर्शक अभ्यास	दोन महिने
४	संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा	तीन महिने
५	माहितीचे संकलन	तीन महिने
६	माहितीचे विश्लेषण	तीन महिने
७	हस्तलिखित अहवाल	दोन महिने
८	मार्गदर्शक परिक्षण व सुधारणा	एक महिना
९	अहवाल लेखन बांधणी	दोन महिने

१६. संशोधनाचे अंदाजपत्रक :

अ. क्र.	तपशिल	अपेक्षित खर्च
१	आराखडा निर्मिती	५००
२	पुस्तक खरेदी	५,०००
३	साधन निर्मिती	५,०००
४	प्रवास खर्च	१०,०००
५	टपाल खर्च	१,०००
६	अहवाल लेखन	२०,०००
७	अहवाल बांधणी	२,०००
८	इतर खर्च	५,०००
	एकूण खर्च	४८,५००

१७. संदर्भ ग्रंथसूची :

१. कुंडले, सुरेखा आणि इ.(२००५) एम. एड. संशोधन मार्गदर्शिका भाग १ व भाग २.
२. डॉ यु के घोरमोडे, कला घोरमोडे. (२००५) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर, विद्या प्रकाशन.
३. डॉ प्रदीप आगलावे.(२०००) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, नागपूर , विद्या प्रकाशन.
४. डॉ अरविंद दुनाखे.(१९९८) शालेय व्यवस्थापन प्रशासन व संघटन , पुणे, नूतन प्रकाशन.
५. डॉ जी टी खुरपे.(२०१४) भारतीय शिक्षण प्रणाली आणि व्यवस्थापन, लातूर, अरुणा प्रकाशन.
६. डॉ म बा कुंडले. शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र , नाशिक, श्री. विद्या प्रकाशन.
७. डॉ शैला चाव्हाण, प्रा. राजेंद्र थिगळे, छात्रअध्यापक सेवाकाल, नाशिक, इनसाईट पब्लिकेशन.
८. डॉ गोरोबा खुरपे. (२०१३) शिक्षक प्रशिक्षणातील आंतरवासिता, लातूर, संकल्प प्रकाशन.
९. न. रा. पारसनीस, शिक्षक प्रशिक्षण, नागपूर, नूतन प्रकाशन.
१०. www.Internship.com.

संशोधक — **मार्गदर्शक**

सिंधीकुमठे विश्वनाथ प्रभाकर — **डॉ. मुगळे दिलीप मनोहर**